# विद्यापीठात ‘स्वच्छ कोल्हापूर’

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

‘शिवाजी विद्यापीठातर्फे अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या शंभर विद्यार्थी क्षमतेच्या वसतीगृहासाठी राज्य सरकारकडून निधी उपलब्ध करुन दिला जाईल. या कामाला गती लाभावी यासाठी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्यासोबत विशेष बैठक घेऊ’, अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. तसेच विद्यापीठ परिसराभोवती उभारलेल्या संरक्षक भिंतीवर ‘स्वच्छ व सुंदर कोल्हापूर’चे चित्रमय दर्शन घडवून कोल्हापूरच्या सुशोभिकरणात भर घालावी, अशी सूचना त्यांनी केली. प्रशासनाने त्याला होकार दर्शविला.

‘स्वच्छ व सुंदर कोल्हापूर’चे चित्रमय दर्शन घडविण्यासाठी कलानिकेतन कॉलेजचे सहकार्य घेण्यात येणार आहे. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील निधी व इतर मागण्यांची पूर्तता करण्यासाठी सरकार सकारात्मक असल्याचेही पाटील यांनी सांगितले. पालकमंत्री पाटील यांच्या उपस्थितीमध्ये विद्यापीठात सोमवारी बैठक झाली. या बैठकीत कुलगुरू देवानंद शिंदे यांनी सुवर्ण महोत्सवी वर्षांत राज्य सरकारकडून घोषित निधी लवकर विद्यापीठाला मिळवा, अशी अपेक्षा व्यक्ती केली.

## पालकमंत्री देणार वसतिगृहांसाठी निधी

विद्यापीठाने प्रायोगिक तत्वावर तीन जिल्ह्यातील दुर्गम, अतिदुर्गम भागातील एक हजार विद्यार्थिनींच्या एसटी पासचा वार्षिक खर्च करण्याची योजना आखली आहे. या योजनेच्या पहिल्या वर्षासाठीचा आवश्यक निधी देऊ. तसेच विद्यापीठाने दुर्गम भागातील ५० कॉलेजमध्ये स्वच्छतागृहे उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. या संदर्भातील अंतिम प्रस्ताव विद्यापीठाने तयार करुन सादर करावा, असेही पालकमंत्र्यांनी सुचविले. बैठकीला प्रकुलगुरू डी.टी. शिर्के, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार, महापालिका आयुक्त अभिजित चौधरी, कुलसचिव विलास नांदवडेकर, वित्त व लेखाअधिकारी व्ही. टी.पाटील, शैक्षणिक अधिकारी प्राचार्य डी. आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, उपकुलसचिव डॉ. जी. एस. कुलकर्णी आदी उपस्थित होते.

पुढारी

# ‘जीआयएस-एमआयएस’ तंत्राने जिल्ह्यात पूर नियंत्रण

## अमेरिकेतील ‘प्रुडो’ आणि शिवाजी विद्यापीठाचा पुढाकार

**कोल्हापूर : अनिल देशमुख**

जिल्ह्यातील पूर नियंत्रणासाठी ‘जीआयएस आणि एमआयएस’ तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. अमेरिकेतील प्रुडो विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागाच्या वतीने जिल्हा प्रशासनाला हा प्रकल्प दिला जाणार आहे. या तंत्रज्ञानाद्वारे पूर नियंत्रण केल्यास भविष्यात मोठी जीवित व वित्त हानी टाळता येईल, असा विश्वास जिल्हा प्रशासनाला आहे.

राज्यात सर्वाधिक पाऊस पडणाऱ्या जिल्ह्यांपैकी कोल्हापूर एक आहे. जिल्ह्यात धरणे आणि नद्यांचे जाळे मोठे आहे. पश्चिम घाटातील महत्त्वाच्या असलेल्या या जिल्ह्यात पूरस्थिती अनेकदा गंभीर होत असते. कोकण, गोवा, कर्नाटकातील काही गावांशी पान ७ ▶

| जिल्ह्यातील पूरस्थिती | |
|---|---|
| प्रमुख नद्या | 12 |
| पूरबाधित गावे | 129 |
| पूरबाधित शहरे | 3 |

पुढारी

# ‘जीआयएस-एमआयएस’ तंत्राने जिल्ह्यात पूर नियंत्रण

**(पान १ वरून)** जिल्हामार्गे होणारा संपर्कही अनेकदा तुटतो. जिल्ह्यातील दळणवळणावरही मोठा परिणाम होतो. जीवित व वित्त हानीही पुरामुळे झाल्याचे प्रकार घडले आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाने राज्यात आपत्ती व्यवस्थापनाचे ‘रोल मॉडेल’ विकसित केले आहे. त्यात आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जिल्ह्याचे ‘फ्लड मॅनेजमेंट’ अधिक प्रभावी करण्याचा जिल्हा प्रशासनाचा प्रयत्न सुरू आहे.

मूळचे कोल्हापूरचे असलेले आणि प्रुडो विद्यापीठात पूरस्थितीवर संशोधन करणारे, अमेरिका फ्लड मॅनेजमेंटमधील महत्त्वाचे घटक असलेले डॉ. व्यंकटेश मेरवाडे आणि शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विभागाचे डॉ. सचिन पन्हाळकर यांच्या मदतीने जिल्ह्यासाठी पूर नियंत्रण प्रकल्प तयार करण्यात येणार आहे. याकरिता आवश्यक माहिती जिल्हा प्रशासनाने संबंधितांना उपलब्ध करून दिली आहे. उपलब्ध माहिती आणि

> “जिल्ह्यात अनेकवेळा पूरस्थिती निर्माण होते, त्याचे व्यवस्थापन करताना शक्य तितकी जीवित व वित्त हानी टाळण्यावर प्रशासनाचा भर असतो, त्यादृष्टीनेच नियोजन असते. या तंत्रज्ञानाद्वारे केल्या जाणाऱ्या प्रकल्पामुळे पूर व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे करता येणे शक्य होईल.
>
> – **प्रसाद संकपाळ**, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी
>
> या प्रकल्पाबाबत प्राथमिक चर्चा झाली आहे, त्यानुसार लवकरच रिपोर्ट जिल्हा प्रशासनाला सादर होईल. त्यानुसार पुढील कार्यवाही करून या तंत्रज्ञानाद्वारे जिल्ह्याचे पूर आणि भविष्यातील सर्वच आपत्तींचे नियंत्रण आणि व्यवस्थापन करणे शक्य होईल.
>
> – **संजय शिंदे**, निवासी उपजिल्हाधिकारी”

जिल्ह्याचा नकाशा यावर आधारित ‘फ्लड मॅनेजमेंट’ सिस्टिम विकसित करण्यात येणार आहे. ‘जीआयएस’ म्हणजे भौगोलिक माहिती आणि ‘एमआयएस’ म्हणजे व्यवस्थापन माहिती यांची सांगड घातली जाणार आहे.

या नव्या प्रकल्पात आवश्यक माहिती नकाशासह उपलब्ध होणार आहे. यामुळे जिल्ह्यातील पूरस्थितीचे वास्तव चित्र प्रत्येकवेळ स्पष्ट होणार आहे.

आपत्कालीन परिस्थिती सद्यस्थिती, त्याची व्याप्ती नकाशाव स्पष्ट होणार आहे. यामुळे रस्ते, पूल गावे कधी बाधित होऊ शकतील याची माहिती आगाऊ मिळ शक्य होईल. त्यादृष्टीने आप व्यवस्थापन करणे शक्य होण आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 AUG 2018
तरूण भारत

# 'ध्येयासाठी संघर्षाशिवाय पर्याय नाही'

कोल्हापूर : यशस्वीतेच्या पलिकडे जाऊन काही गोष्टी मिळवायला व वाचायला शिकल्या पाहिजेत. त्यासाठी अभ्यासातील गुणाबरोबरच कौशल्याची वाढ होणे गरजेचे आहे. कारण स्पर्धेच्या युगात ध्येय गाठायचे असेल तर संघर्षाशिवाय पर्याय नाही, असे मत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. महावीर महाविद्यालयातील आयोजित केलेल्या विद्यार्थी गुणगौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. संस्थेचे चेअरमन ॲड. के. ए. कापसे अध्यक्षस्थानी होते. डॉ. शिर्के म्हणाले, संघर्ष हा असायलाच हवा. आपल्याकडे खूप क्षमता आहेत. हिमा दास, नवनाथ गोरे, अंध फातिमा मुल्लाणी, राही सरनोबत, यांचे सुवर्ण यश दिसते. पण त्यामागे असलेला त्यांचा संघर्ष लक्षात घेणे गरजेचे आहे.यावेळी प्रा.एस.एम्. पाटील, महावीर देसाई, विशाल लडगे, डॉ. अरूण पाटील, डॉ. शरद गायकवाड आदी उपस्थित होते.

29 AUG 2018
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पृथ्वीच्या संवर्धनासाठी पर्यावरण संस्कृतीची गरज

## प्रा. डॉ. एच.एम देसरडा यांचे प्रतिपादन : 'जमिनीचे संकट दृष्टीकोन आणि समस्या' वर मार्गदर्शन

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

जागतिकीकरण, औद्योगिकीकरण आणि हवामान बदलामुळे जगात अस्थिरता निर्माण झाली आहे. पृथ्वीचे तापमान १५ अंश डिग्री सेल्सीअस असणे गरजेचे आहे. पण औद्योगिकीकरणानंतर ते १.५ इतके वाढले. ते २ डिग्री अंश सेल्सीअस पेक्षा जास्त वाढले तर पृथ्वीला, जमिनीला सांभाळता येणार नाही. पृथ्वीचा कडेलोट होईल आणि जमिनीचा पोत ढासळेल. आताच या सर्वांची क्षमता टोकाला गेली आहे. याला सावरण्यासाठी पर्यावरणीय संस्कृतिच्या निर्मितीची आवश्यकता आहे असे प्रतिपादन प्रा. डॉ. एच. एम देसरडा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठामध्ये अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित जमिनीचे संकट : दृष्टीकोन आणि समस्या" या विषयावर डॉ. देसरडा बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. पी. एस. कांबळे होते.

डॉ. देसरडा म्हणाले, औद्योगिकीकरण आणि रासायनिक खते यामुळे जमिनीचा पोत खालावतो आहे. पृथ्वीचे आयुष्य ४.६६ कोटी वर्षाचे आहे. पण मानवाच्या हव्यासाने ताम्र, आश्म अशा इतर सर्व युगांपेक्षा औद्योगिकीकरणाने कमी केले आहे. स्टिफन हॉकींग हे जाता जाता जगाला पृथ्वी सांभाळून वापरण्याचा इशारा देवून गेले आहेत. याचे ताजे उदाहरण पाहायचे झाल्यास आजची केरळची घटना. या आपत्तीचा प्रत्येकाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. त्यासाठी 'वसुंधरा बचाव, मानव बचाव, किसान बचाव" हा नारा देसरडा यांनी दिला.

ते पुढे म्हणाले, भारत हा देश शेतीप्रधान आहे. ५१ टक्के जनता शेतीवर काम करणारी आहे. पण बदललेले वातावरण, भांडवलशाही, सरकार आणि बाजार या सर्वांमुळे आज येथील शेती ही रोजगार विहीन, त्रणहीन, आवाजरहीत आणि भविष्यरहित झाली आहे. सर्व बाजूने शेतकऱ्याची मुस्कटदाबी होत आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांच्या मृत्युचे प्रमाण दिवसागणीक वाढत चालले आहे.

देशात ३६ हजार तर महाराष्ट्रात मृत्युची संख्या १२ हजारांवर आहे. मराठा विदर्भात तर तरूण शेतकऱ्यांचे प्रमाण वाढत चालले आहे. सुत्रसंचालन एस. पी. पंचगल्ले यांनी तर डॉ. व्ही. पी. कट्टी यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 AUG 2018
तरुण भारत

# पी. जी. डिप्लोमा इन ई-बिझनेसच्या प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम.बी.ए अधिविभागामध्ये पी. जी. डिप्लोमा इन ई-बिझनेस या एक वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे. या कोर्सचे प्रवेश अर्ज हे विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमधील एम.बी.ए अधिविभागामध्ये उपलब्ध आहेत. या कोर्सला कोणत्याही विषयाचे पदवीधर विद्यार्थी, नोकरदार वर्ग, व्यावसायिक या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतात. ३१ ऑगस्टपर्यंत प्रवेश घेणे बंधनकारक आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी व प्रवेश घेण्यासाठी एम.बी.ए विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन एम. बी. ए अधिविभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी केले आहे.

लोकमत

# भारती विद्यापीठात कार्यशाळा उत्साहात

पाचगाव : भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर येथे नवीन बदललेल्या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रायोजित कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ पासून बी. फार्मसी पदवीसाठी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचा नवीन अभ्यासक्रम लागू करण्यात आला. याच अनुषंगाने फार्माकॉग्नोसी वन आणि पिजिकल फार्मसुटिक्स या विषयांच्या बदललेल्या अभ्यासक्रमांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेमध्ये तज्ज्ञांनी शिक्षक शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुहित गिल्डा, प्राचार्य एच. एन. मोरे, डॉ. व्ही. आर. साळुंखे, डॉ. एस. जी. किल्लेदार, डॉ. एस. व्ही. पाटील, डॉ. एन. आर. जाधव, डॉ. ए. ए. हजारे, तसेच ५० हून अधिक शिक्षकांनी सहभाग घेतला होता. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन मयुरी शितोळे व पूनम जाधव यांनी, तर आभार प्रा. यु. एस. पाटील यांनी मानले.

Hello Kolhapur
Page No. 7 Aug 29, 2018
Powered by: erelego.com